follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

‘लाडक्या बहिणीं’ना आता सिलिंडरही मिळणार मोफत; लवकरच अंमलबजावणी सुरु

मुंबई : महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा करण्यात आली. २१ ते ६५ वर्ष वयोगटातील महिलांसाठी ही योजना लागू असणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेनुसार पात्र महिलांना सरकारकडून महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. अशातच आता महायुती सरकार महिलांना आणखी एक मोठं गिफ्ट देणार आहे. राज्यातील लाडक्या बहिणींना आता वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत मिळणार आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीची तयारी सुरु असल्याची माहिती समोर आली आहे.

RNI Regd No.७२१०५/९९ ✻ वर्ष २५ ✻ अंक ३०१ सातारा ✻ शुक्रवार दि २६ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

राज्यात पावसाचा हाहाकार

मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघरला पावसाने झोडपले; सर्वत्र जलमय स्थिती

मुंबई : पावसामुळे यंत्रणांचे अक्षरश: ‘पानी’पत झाले. मात्र दुपारनंतर पाऊस ओसरल्याने सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. शुक्रवारीही मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांना ऑरेंज तर रायगडला रेड अलर्ट दिला आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही जलाशयांच्या पाणलोट क्षेत्रांत जोरदार पाऊस कोसळत असल्याने पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. धरणांतील पाणीसाठा ६६ टक्क्यांवर गेल्याने मुंबईसह ठाणे शहर, भिवंडीतील १० टक्के पाणीकपात २९ जुलैपासून मागे घेण्यात येणार आहे. मुंबई महानगराला वर्षभर पुरेसे पाणी पुरविण्यासाठी अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय, भातसा, विहार आणि तुळशी या सात जलाशयांमध्ये एकत्रितरीत्या एकूण उपयुक्त पाणीसाठा १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लीटर इतका असावा लागतो.

मात्र, गेल्या उन्हाळ्यात तो संपल्याने राखीव पाण्यासाठ्यावर मुंबईकरांची तहान भागवावी लागली होती. ६६.७७% जलसाठा गेल्या काही दिवसांपासून धरणांच्या पाणलोट क्षेत्रांत दमदार पर्जन्यवृष्टी होत आहे. त्यामुळे सातही धरणांतील एकत्रित पाणीसाठा ६६.७७ टक्क्यांहून अधिक झाला आहे. तुळशी, तानसा, विहार आणि मोडकसागर हे जलाशय पूर्ण भरून वाहू लागले आहेत.

पुणे पाण्यात, कोल्हापूरलाही वेढा

गेले तीन दिवस मराठवाडा वगळता सर्वत्र पडत असलेल्या मुसळधार पावसाने धरणांच्या पाणीसाठ्यात जलद गतीने वाढ होऊन धरणे वाहू लागली आहेत. अवघ्या चोवीस तासांत धरणसाठ्यात चार टक्के वाढ झाल्याने अनेक धरणांतून विसर्ग सोडल्यामुळे नद्यांना पूर आला आहे. खडकवासला धरणातून विसर्ग सुरू केल्याने पुणे शहरात आलेल्या पुरात चार जणांचा मृत्यू झाला आहे.

पाणीसाठा समाधानकारक स्थितीत पोहोचल्यामुळे आता १० टक्के पाणी कपात रद्द केली जाणार आहे.

रायगड जिल्ह्यातही बुधवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू असून पाताळगंगा, अंबा, कुंडलिका, सावित्री आदी प्रमुख नद्या ओसंडून वाहू लागल्या आहेत. यामुळे पूरस्थिती निर्माण होऊन शेकडो गावांचा संपर्क तुटला आहे. यातील म्हसळा तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याने लोकांना अंधारात राहावे लागत आहे. रायगडमध्ये हवामान विभागाने २४ जुलै रोजी काही भागांत २४ तास अतिवृष्टी होण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर बुधवारी रात्रीपासून पावसाचा जोर वाढला. दक्षिण रायगडमधील नागोठणे, रोहा, महाड या भागांत यामुळे पूरस्थिती निर्माण झाली.

दरम्यान, हवामान खात्याने रायगड, रत्नागिरी, सातारा जिल्ह्यांत शुक्रवारसाठी रेड अलर्ट जारी केला.पुण्यात डेक्कन परिसरातील पुलाची वाडी येथे पहाटे नदीपात्रातील स्टॉल काढण्यासाठी गेलेल्या तिघांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. ताम्हिणी घाटातील आदरवाडीत दरड कोसळून एकाचा बळी गेला. मावळ, मुळशी, भोर व वेल्हा तालुक्यांमध्ये पावसाचा जोर अधिक आहे. सर्वाधिक ५५६ मिलिमीटर पाऊस ताम्हिणी घाटात नोंदला आहे. जिल्ह्यातील सर्व धोकादायक पर्यटनस्थळे पुढील दोन दिवसांसाठी तातडीने बंद करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील २ प्रमुख राज्यमार्ग व ५ प्रमुख जिल्हामार्ग, असे सात मार्ग बंद करण्यात आले आहेत. दरम्यान, पालकमंत्री अजित पवार यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी केली आहे. मदत व बचावकार्यासाठी लष्कर, तसेच आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या.चंद्रपूरच्या १६ गावांचा मार्ग बंदचंद्रपूर जिल्ह्यात वैनगंगा, इरई, वर्धा, उमा व अंधारी नदीला पूर आल्याने बल्लारपूर, सिंदेवाही, मूल, पोंभुर्णा, ब्रह्मपुरी तालुक्यांतील एकूण १६ गावांचा मार्ग गुरुवारी बंद झाला.

तेलंगणाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करा : नाना पटोले

मुंबई : राज्यातील शेतकऱ्याला अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतमालाला भाव नाही, शेतीला लागणारे बि-बियाणे, खते व कृषी साहित्य प्रचंड महाग झालेली आहेत, कठीण परिस्थितीत जीवन जगत असलेल्या बळीराजाला आधार देणे सरकारचे कर्तव्यच आहे. तेलंगणातील काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली आहे, महायुती सरकारनेही संकटात सापडलेल्या बळीराजाला सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी करत महायुती सरकारने कर्जमाफी केली नाही तर सत्तेवर येताच महाविकास आघाडी सरकार शेतकऱ्याला कर्जमाफी देईल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यात यावर्षी काही भागात कोरडा दुष्काळ तर काही भागात ओला दुष्काळ अशा परिस्थितीचा सामना शेतकऱ्याला करावा लागला. आताही काही भागात अतिवृष्टी झाली आहे तर काही भागात अजून पावसाची प्रतिक्षा आहे, काही भागात दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. बोगस खते बि-बियाणांचा सुळसुळाट आहे पण सरकार फक्त कारवाई करण्याच्या पोकळ घोषणा करते. पीक विम्याचा फायदाही शेतकऱ्याला मिळत नाही तर पीक विमा कंपन्यांनाच मोठा फायदा होतो. परिस्थितीने पिचलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. मागील ६ महिन्यात राज्यात १७२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, हे महाराष्ट्राला भूषणावह नाही. राज्यातील शेतकऱ्याची आताची परिस्थिती अत्यंत बिकट असून कर्जमाफी करण्याची गरज आहे.

महायुती सरकार केवळ लाडका बिल्डर, लाडका उद्योगपती यांच्यासाठीच काम करत आहे. उद्योगपती अनिल अंबानी यांचे १७०० कोटी रुपये माफ करण्यासाठी सरकारकडे पैसे आहेत, मोठ्या उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज भाजपा सरकारने माफ केले पण शेतकऱ्यांना देण्यासाठी भाजपा सरकारकडे पैसे नाहीत. भाजपा सरकार हे शेतकरी विरोधी आहे. शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती असल्याने त्यांचे कर्जमाफ केले पाहिजे अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने ११ जून २०२४ रोजी महामहिम राज्यपाल यांची भेट घेऊन केली होती.

शाळांना २६ व २७ जुलै रोजी सुट्टी जाहीर

कोल्हापूर : भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक २६ व २७ जुलै २०२४ रोजी जिल्ह्याला अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आलेला असून जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत अतिवृष्टी होत आहे. हवामान विभागाने येत्या काही तासात कोल्हापूर शहर आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्याने जिल्ह्यातील शाळा २६ व २७ जुलै २०२४ अशी २ दिवस बंद ठेवणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी २ दिवसांची सुट्टी जाहीर केली आहे. याबाबत पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शाळांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर करावी याबाबत चर्चा केली होती.

जिल्ह्यातील राधानगरी, दुधगंगा, वारणा व तुळशी या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. जिल्ह्यातील सर्व नद्या धोका पातळीला वाहत आहेत, त्यामुळे शहरासह ग्रामीण भागात पाणी येत आहे. याकरीता नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे. जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका, अनुदानित व विना अनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्थेमधील सर्व विद्यार्थ्यांना दिनांक २६ व २७ जुलै २०२४, अशी २ दिवसांची सुट्टी जाहीर केली आहे. तथापी, या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे असे आदेश देण्यात आले आहेत.

मनसे लढविणार विधानसभेच्या अडीचशे जागा: राज ठाकरे यांची घोषणा

मुंबई : लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला, पर्यायाने महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आगामी विधानसभा निवडणुकीत सव्वादोनशे ते अडीचशे जागांवर आपले उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्ष पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ही घोषणा केली.

पक्षाच्या पाच निरीक्षकांचे पथक राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात भेट देऊन मतदारसंघाचा आढावा घेणार आहे. संबंधित पदाधिकाऱ्यांनी आणि इच्छुक उमेदवारांनी मतदारसंघाची माहिती आणि मतदारसंघातील राजकीय परिस्थितीचे आपले आकलन या पदाधिकाऱ्यांना कथन करावे. इच्छुकांनी दिलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यात येणार आहे. निवडणूक लढविण्याची प्रबळ इच्छा असलेल्या आणि निवडून येण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनाच पक्षाकडून उमेदवारी देण्यात येईल, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी आपण पर्जन्यमानाचा अंदाज घेऊन एक ऑगस्ट पासून राज्यव्यापी दौरा करणार आहोत. पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी या निवडणुकीसाठी कंबर कसून कामाला लागावे. या निवडणुकीत आपल्या पक्षाचे काही लोक तरी मला सत्तेत पाठवायचे आहेत. काही जणांना हे हास्यस्पद वाटेल. मात्र, हे घडून येणारच, असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला. युती, आघाडी होणार का याचे विचार न करता निवडणुकीसाठी कामाला लागण्याचे आदेश त्यांनी मनसैनिकांना दिले.

यूपीएससी २०२३ यशस्वितांचा १४ वा राष्ट्रीय पातळीवरील सत्कार सोहळा

पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्मेंट, पुणेतर्फे केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) स्पर्धा परीक्षा २०२३ मध्ये यशस्वितांचा १४वा राष्ट्रीय पातळीवरील सत्कार सोहळा शुक्रवार, दि. २६ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभासाठी केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) माजी अध्यक्ष डी. पी अग्रवाल आणि लोकसत्ता पार्टीचे अध्यक्ष व माजी सनदी अधिकारी डॉ. जयप्रकाश नारायण हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच विद्यापीठाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड हे ही उपस्थित राहतील. भारतातून द्वितीय आलेले अनिमेष प्रधान यांचा सत्कार करण्यात येणार आहे. ७५ हजार रूपयांचे पारितोषिक तसेच शाल व श्रीफळ देण्यात येणार आहे. त्याचबरोबर १६० यशस्वीतांचा सत्कार होणार आहे.

सिमेंट रस्ते आणि पेवर ब्लॉकमुळे पुणे जलमय: अजित पवार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील प्रकार

मुंबई : धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर झालेला मुसळधार पाऊस आणि पुणे शहरातील सिमेंटचे रस्ते, पेवर ब्लॉकस् यामुळे पुणे शहर जलमय झाले असल्याचे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. पुण्यातील पावसाळी संकटाचा आढावा घेण्यासाठी पवार पुण्याकडे रवाना झाले आहेत.

जमीन कोरडी असताना तिची पाणी शोषून घेण्याची क्षमता वाढते. मागील दोन दिवस सतत सुरू असलेल्या पावसामुळे जमीन ओली असल्याने तिची पाणी शोषून घेण्याची क्षमता कमी झाली. त्याचप्रमाणे खडकवासला हे धरण केवळ पावणेतीन टीएमसी क्षमतेचे आहे. या धरणाच्या क्षेत्रातच तब्बल नऊ इंच पाऊस झाला. त्यामुळे धरणात एकदम तीन टीएमसी पाण्याची वाढ झाली. त्यामुळे धरणातून पाणी सोडण्याची आवश्यकता निर्माण झाली. नागरिकांची धावपळ टाळण्यासाठी रात्री

पाणी सोडण्याऐवजी पहाटे धरणातून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला गेला, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

पुणे शहरात सिमेंटचे रस्ते आणि पेवर ब्लॉकचे पदपथ आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी वाव उरलेला नाही. मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास वाव नसल्यामुळे रस्त्यांनाच नदी नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले, असे पवार यांनी सांगितले.

आपल्याकडे २८ तारखेपर्यंत पावसाच्या अंदाज यची माहिती उपलब्ध आहे. त्यानुसार या पुढील काळातही पुण्यात पाऊस सुरू राहणार आहे. त्यामुळे प्रशासनाला सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असेही पवार यांनी सांगितले.

स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुण्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. पुण्याचे जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, हवामान विभाग यांच्याशी मुख्यमंत्री संपर्कात आहेत. बचाव कार्यासाठी शहरात राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणेचे पथक आणि लष्कराचे बचाव पथकही तैनात करण्यात आले आहे. आवश्यकता भासल्यास हेलिकॉप्टरचा वापर करून नागरिकांचा बचाव करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

खासदार सुप्रिया सुळे आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शहरात विकासकामे करताना पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी अथवा जमिनीत मुरण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या गेल्या नाहीत, याबद्दल प्रशासनाला दोषी ठरविले आहे.

महायुतीत जागा वाटपाचा घोळ लांबवू नका

अजित पवार यांचा अमित शहा यांच्याकडे आग्रह

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीतील घटकपक्षांच्या जागावटपाचा घोळ लांबवू नका. वेळेवर सूत्र निश्चित करून जागावाटप जाहीर करा, असा आग्रह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे धरला आहे.

अजित पवार यांनी तातडीने दिल्ली गाठून मध्यरात्री अमित शहा यांची भेट घेतली. ही भेट प्रामुख्याने आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जागा वाटपाची चर्चा करण्यासाठी घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित यश मिळू शकलेले नाही. अजित पवार यांच्या गटाला तर केवळ एका जागेवर विजय प्राप्त करता आला. भारतीय जनता पक्षाची अवस्था तर मागील लोकसभा निवडणुकीच्या तुलनेने फारच बिकट झाली आहे. लोकसभा निवडणुकीत अनेक मतदारसंघ युतीतील घटक पक्ष अडून राहिल्याने जागा वाटपाची प्रक्रिया दीर्घकाळ लांबली. त्यामुळे उमेदवारांना प्रचार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळू शकले नाही. विधानसभा निवडणुकीत अशी वेळ येऊ देऊ नये, अशी अजित पवार यांची भूमिका आहे.

भाजपसमोर पेच

मागील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ५१ उमेदवार निवडून आले. त्या सर्व जागांवर अजित पवार यांनी दावा सांगितला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांसमोर आपला उमेदवार उभा करून त्याला निवडून आणायचे, असा अजित पवार यांचा पण आहे. त्याचप्रमाणे सध्या काँग्रेसचे आमदार असलेल्या काही जागांवर अजित पवार गटाकडून दावा केला जाणार आहे. विशेषतः मुंबईतील मुस्लिम मतदान निर्णायक असलेल्या चार ते पाच विधानसभा मतदारसंघात आपल्याला उमेदवारी मिळावी, अशी अजित पवार गटाची मागणी आहे. अजित पवार गटाने विधानसभेच्या ८० ते ९० जागांवर धावा केला आहे.

शिवसेना एकनाथ शिंदे गटाने विधानसभा निवडणुकीत चांगला स्ट्राईक रेट दाखविला आहे. त्याच्या आधारावर शिंदे गट तब्बल १०० जागांवर दावा करीत आहे. दुसरीकडे भाजपचे स्थानिक नेते १७० ते १८० जागांवर भाजपचे उमेदवार उभे करून स्वबळावर सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करावा, याबाबतीत आग्रही आहेत. या पार्श्वभूमीवर आपण किती जागांवर निवडणूक लढवायची आणि किती जागा मित्र पक्षांना सोडायच्या याचा पेच भाजप समोर आहे.

पश्चिम घाटमाथ्यावर अतिमुसळधार

ताम्हिणीत तब्बल ५५६, भिरा ४०१, लोणावळ्यात ३२९ मिलिमीटर पावसाची नोंद

पुणे : मोसमी पावसाने गुरुवारी रात्रभर पश्चिम घाटमाथ्यावर धुमाकूळ घातला. ताम्हिणीमध्ये ५५६ मिलिमीटर, भिरामध्ये ४०१ आणि लोणावळ्यात ३२९ मिमी पाऊस पडला. घाटमाथ्यावर अन्य ठिकाणीही सरासरी २५० मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला. गेल्या काही दिवसांपासून घाटमाथ्यावर जोरदार पाऊस पडत आहे. मात्र, मंगळवार, बुधवारपासून पावसाच्या तीव्रतेत वाढ झाली आहे. गुरुवारी सकाळी साडेआठपर्यंत घाटाच्या परिसरात अतिमुसळधार पाऊस पडला. लोणावळा (टाटा) ३११, लोणावळा ३२९, शिरगाव ४८४, आंबोणे ४४०, डुंगरवाडी ४०७, कोयना (पोफळी) १३२, कोयना (नवजा) १५७, खोपोली २२५, ताम्हिणी ५५६ आणि भिरा ४०१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

किनारपट्टी परिसरातही मध्यम ते मुसळधार पाऊस पडला, तर गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत अलिबाग येथे २९ मिलिमीटर, हर्णे येथे ५५, कुलाबा ४५, सांताक्रुज ७७, रत्नागिरी येथे ३४ मिमी पाऊस पडला आहे. मध्य महाराष्ट्रात महाबळेश्वर येथे १४३ मिलिमीटर, कोल्हापूर येथे १७, सातारा येथे २० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर मराठवाड्यात काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा, तर विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडला.

हवामान विभागाने शुक्रवारी (२६ जुलै) किनारपट्टी आणि घाटमाथ्यावर मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. रत्नागिरी, रायगड आणि साताऱ्याला लाल इशारा दिला आहे. जिल्ह्याच्या घाट परिसरात बहुतेक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. सिंधुदुर्ग, कोल्हापूर, पुणे, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांना नारंगी इशारा देण्यात आला आहे. नाशिक, धुळे, नंदूरबार आणि पूर्व विदर्भाला पिवळा इशारा देण्यात आला आहे.

इंद्रायणी नदी काठी असलेल्या इमारती मधून ३५ जणांची सुखरूप सुटका

क्षेत्र देहू इंद्रायणी नदीस महापूर आला असून , येलवाडी गावच्या हद्दीत नदीकाठी असलेल्या इमारती मध्ये अडकलेल्या ३५ लोकांची सुखरूप सुटका करण्यात आली. इंद्रायणी नदीच्या पाण्याची पातळी वरचेवर वाढत आहे.नदीपात्रात कोणी जाऊ नये ,पुलावर कोणी थांबू नये.पुलावर कोणी वाहने उभी केली तर त्यांच्यावर वाहतूक विभागाच्या वतीने दंडात्मक कारवाई करण्यात येईल.शक्यतो घराच्या बाहेर कोणी पडू नये।अशा सूचना देहूनगर पंचायटीकडून देण्यात येत आहेत.तसेच इंद्रायणी घाटावर जाणारे सर्व रस्ते पत्रे मारून बंद करण्यात आले आहेत.

गेली तीन दिवसा पासून मावळ तालुक्यासह देहू देहूरोड परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे.त्यामुळे इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला आहे.

येलवाडी ग्राम पंचायतीच्या हद्दीत सारंग हॉटेल जवळ काही इंद्रायणी नदीच्या काठी घरे ,इमारती बांधल्या आहेत.आज बुधवार (ता.२५) रोजी या इमारतींना पुराच्या पाण्याने वेढा घातला , त्यामुळे त्यात ३५ लोक अडकली होती.ही घटना कळताच म्हाळुंगे पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल केले त्यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीमला पाचारण केले. त्यांच्या मदतीने ३५ लोकांना सुखरूप बाहेर काढले.आणि पुढील अनर्थ टळला.या ३५ लोकांची येलवाडीच्या मराठी शाळेत राहण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे.

तीन दिवसा पासून मुसळधार पाऊस पडत असल्याने ,इंद्रायणी नदीच्या पाण्याने पुराची पातळी ओलांडली आहे.देहूतील ब्रिटिश कालीन पूल बुडण्यास अवघे एक ते दोन फुटाचे अंतर राहिले असून ,पित्ती धर्मशाळेचा पहिला तळमजला पाण्याने पूर्ण भरला आहे.संत गाडगे महाराज धर्मशाळा नव्वद टक्के पाण्याने भरली आहे तर शंकर मंदिर ,,संत चोखा मंदिर देखील पाण्याने वेढले गेले असून ,स्मशान भूमीतही पाणी शिरले आहे.

देहूगावातील गटारी चेंबर्स तुंबल्याने आणि वेळीच त्यांची दुरीस्ती आणि साफसफाई केली नसल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही.देहूतील मुख्य रस्त्यासह बऱ्याच ठिकाणी पावसाचे पाणी तुंबले आहे.रस्त्यावर मोठं मोठे खड्डे पडले आहेत.त्यात पाणी साचल्याने डबके तयार झाले आहेत.पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने हे पाणी रस्त्यावरूनच वाहत असल्याने या रस्त्यांना ओढ्या नाल्यांचे स्वरूप निर्माण झाले आहे.

पावसामुळे लोकल मंदावली

मुंबई : मुंबईत बुधवारी रात्रीपासून कोसळणाऱ्या पावसाने गुरुवारी पहाटे जोर धरला आणि मुंबईकरांची त्रेधा उडाली. मुसळधार पावसामुळे दृश्यमानता कमी झाली. परिणामी, मोटरमनला लोकलचा वेग कमी करण्याच्या सूचना करण्यात आल्या. त्यामुळे लोकल सेवा मंदावली. अनेक लोकल एका मागे एक संथगतीने धावत आहेत. विस्कळीत झालेल्या लोकल सेवेमुळे प्रवाशांना इच्छितस्थळी पोहचण्यास प्रचंड विलंब होत आहे.

मुंबईसह ठाण्यातील अनेक सखल भागात पाणी भरण्यास सुरुवात झाली. अनेक नद्यांना पूर येऊन जनजीवन विस्कळीत झाले. नदी पुलावरून पाणी वाहू लागल्याने, रस्ते मार्ग ठप्प झाले. परिणामी, मध्य रेल्वेवरील लोकलचे वेळापत्रक कोलमडले आहे.

सकाळपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने, त्याचा फटका लोकलच्या वेगाला बसला. ढगाळ वातावरणामुळे दृश्यमानता कमी झाल्याने दूरचा लोकल मार्ग स्पष्ट दिसत नाही. यामुळे मोटरमनला लोकलचा वेग कमी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. सीएसएमटीकडे येणाऱ्या अप आणि डाऊन मार्गावरील लोकल २० ते ४० मिनिटे, हार्बर मार्गावरील सीएसएमटी - बेलापूर, पनवेल मार्गावरील अप आणि डाऊन लोकल १० ते १५ मिनिटे, तर पश्चिम रेल्वेवरील लोकल १० ते २० मिनिटे विलंबाने धावत आहेत.

पीएमआरडीएचा आपत्कालीन विभाग सक्रिय

तीन पथके, दोन रबर बोटी, रेस्क्यु उपकरणासह मदतीसाठी रवाना

पुणे : पुणे जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी पीएमआरडीएचा आपत्कालीन विभाग अत्याधुनिक यंत्रणेसह सज्ज झाला आहे. प्राधिकरणाच्या अग्निशमन दलामार्फत बचाव कार्य सुरू करण्यात आले असून आपत्कालीन परिस्थितीत उपाय योजनांची तातडीने अंमलबजावणी करा, असे आदेश पुणे महानगर विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी यंत्रणेला दिले.

पुणे जिल्हयात गुरुवारी (२५ जुलै) झालेल्या अतिवृष्टिमुळे पुण्यातील महानगर पालिका हद्दीतील एकता नगर, सभोवतालच्या परिसरात पुर सदृष्य परिस्थीती निर्माण झाली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अग्निशमन दलातील ३ पथके २ रबर बोटी व रेस्क्यु उपकरणासहीत येथे पाठविण्यात आल्या. या पथकामार्फत रेस्क्यु ऑपरेशनसाठी महापालिकेच्या अग्निशमन दलास सहकार्य करण्यात आले आहे. तसेच सुस, बावधन, या ठीकाणी मोठया प्रमाणात रहिवाशी इमारतीमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. त्यामुळे हे लक्षात घेऊन तातडीने प्राधिकरणाच्या अग्निशमन दलामार्फत बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. किरकटवाडी येथे रस्त्यात झाड पडल्याने मोठया प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली होती. रस्त्यावर पडलेले झाड बाजुला सारून वाहतूक सुरळीत करण्यात आली. तसेच वाघोली अग्निशमन केंद्रामधुन दोन पथके विश्रांतवाडी परिसरात सज्ज ठेवण्यात आली आहेत.

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग मोठया प्रमाणत होत असल्याने नांदेड, शिवणे पुलावर दोरखंड बांधून रस्ता बंद करण्यात आला. पुलावरून कोणीही ये-जा करू नये यासाठी पीएमआरडीए प्राधिकरणामार्फत अग्निशमन बंदोबस्त लावण्यात आला आहे. शांतीनगर येथील रहिवाशी इमारतीमध्ये अडकलेल्या एकूण सात लोकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. पीएमआरडीएचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्यासह अग्निशमन अधिकारी व जवान बारकाईने लक्ष्य ठेऊन आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये पूर येणे, दरड कोसळणे, झाडपडी अशा घटना घडल्यास पीएमआरडीएचा अग्निशमन सेवा विभाग सेवा देण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेसह सज्ज झाला आहे.

पुणे जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगर विकास प्राधिकरणच्या यंत्रणेला पहाटे पासूनच सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी जिल्हा यंत्रणांशी संपर्क ठेवून परस्पर समन्वय, सहकार्याने काम करण्याबाबत तसेच जिल्हा प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याच्याबाबत सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी पर्यटनासाठी बाहेर जाऊ नये, अति महत्वाच्या कामाशिवाय कुणीही घराबाहेर पडू नये, तसेच अतिवृष्टी व पुरापासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी.

शिराळा तालुक्यातील शेतकऱ्यांचा ५७ वर्षांचा प्रश्न निकाली

सांगली : शिराळा तालुक्यातील मणदूर खालील धनगरवाडा व विनोबाग्राम येथील शेतकर्यांच्या ५७ वर्षापासून असलेल्या मागणीला अखेर न्याय मिळवून दिला आहे. येथील दोनशे एकर जमीन कब्जे हक्काने सोसायटी सदस्यांच्या वारसांच्या नावावर तातडीने (दहा दिवसात) करावी, असे आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. ही माहिती आमदार मानसिंगराव नाईक यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत दिली. या बैठकीस यशवंत ग्लुकोजचे अध्यक्ष रणधीर नाईक, फत्तेसिंगराव नाईक दुध संघाचे अध्यक्ष अमरसिंग नाईक, प्रचिती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रसिंह नाईक व युवक राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष विराज नाईक उपस्थित होते.

आमदार श्री. नाईक म्हणाले, धनगरवाडा, विनोबाग्राम येथील गट नं. २२१ व २२२ मधील २०० एकर जमिन आहे. ही जमिन जिल्हाधिकार्यांच्या आदेशाने २५ नोव्हेंबर १९६६ रोजी निर्वनीकरण करून विनोबाग्राम सहकारी सोसायटीच्या नावे कसण्यासाठी दिली होती. १९७५ साली सदर सोसायटी अवसायनात निघाली. त्यावेळी सदरची जमीन शासनाकडे जमा करण्यात आली. मध्यंतरी या जमिनीवर वन विभागाचे नाव लागले होते. ही जमिन सोसायटी सदस्यांच्या वारसांच्या वहिवाटीत होती. धनगरवाडा येथे ६९ कुटुंबे तर ३१५ लोकसंख्या तर, विनोबाग्राम येथे १५ कुटुंबात ५५ लोकसंख्या आहे.

आमदार श्री. नाईक म्हणाले, सर्व वस्तूस्थिती, शेतकरी, ग्रामस्थांची मागणीबाबत माहिती समजून घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री पवार यांनी उपस्थित मंत्री व अधिकार्यांशी चर्चा करून सोसायटी सदस्यांच्या वारसांना कब्जे हक्काने सदर जमिन त्यांच्या नावावर करावी. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या दहा दिवसात करावी, असे आदेश दिले. त्यामुळे धनगरवाडा व विनोबाग्राम येथील शेतकरी, ग्रामस्थांचा ५७ वर्षापासून सुरू असलेला संघर्ष व मागणीस यश मिळाले.

काळवाडी येथील महिला बिबट्याच्या हल्ल्यात जखमी

राजदंड / पिंपळवंडी

काळवाडी (ता. जुन्नर) येथील बेल्हेकर वस्ती शिवारातील मंगल नवनाथ बेल्हेकर या महिलेवर बिबट्याने हल्ला करून त्यांना जखमी केले. सदर घटना रविवारी(ता.३१) संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. मंगल बेल्हेकर यांनी सांगितले की त्या व त्यांचे पती नवनाथ बेल्हेकर हे शेतात काम करत असताना केळीच्या शेतातून येत बिबट्याने अचानक माझ्यावर हल्ला केला.

केळीच्या पानांचा आवाज आल्याने मी त्या दिशेने पाहिले असता एक मोठा बिबट्या माझ्याकडे येताना मला दिसला.या बिबट्याने अचानक माझ्यावर हल्ला केला.मी आरडाओरडा केल्याने बाजुलाच असलेले माझे पती नवनाथ बेल्हेकर हे देखील बिबट्याच्या दिशेने पळत आले.मोठ्याने ओरडल्यामुळे बिबट्याने मला सोडले व तो बाजुच्या शेतात पळुन गेला.या हल्ल्यात मंगल बेल्हेकर यांच्या खुब्याला जखम झाली असुन त्यांना पिंपळवंडी येथे उपचारासाठी नेण्यात आले आहे.

सदर घटनेची माहिती वनविभागाला कळवली असता वनविभागाचे वनपाल एस.के. साळुंखे यांनी सदर घटनेची माहिती घेतली. आज रविवारी सकाळी देखील काळवाडी येथील एका वृद्धावर बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असल्याची माहिती काळवाडीचे अजय बेल्हेकर यांनी दिली.भविष्यात कोणतीही जीवित हानी होऊ नये म्हणुन वनविभागाने लवकरात लवकर बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली

मावळ व मुळशी तालुक्यात पर्यटन बंदी

पुणे : पुणे शहर आणि परिसरात मुसळधार पाऊस सुरू असून शहर जलमय झाले आहे. शहराबरोबरच जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने दक्षतेचा उपाय म्हणून प्रशासनाने मावळ आणि मुळशी तालुक्यातील पर्यटन स्थळी जाण्यास पाच दिवसांसाठी बंदी केली आहे. ही बंदी २९ तारखेच्या सकाळी आठ वाजेपर्यंत लागू राहील.

पुणे शहर आणि परिसरात रात्रभर पाऊस पडत आहे. सर्व धरणातून पाणी सोडण्यात आले असून नद्या नाले ओसंडून वाहत आहेत. रस्ते जलमय झाले असून अनेक घरात पाणी शिरले आहे. बचाव कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन यंत्रणाचे पथक आणि लष्कराला ही पचारण करण्यात आले आहे.

मावळ आणि मुळशी तालुक्यातील धरणांसह अनेक ठिकाणी वर्षा पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी विशेषतः पावसाळ्याच्या दिवसात पर्यटकांची गर्दी होते. मात्र, सध्याच्या परिस्थितीमध्ये जीवितहानीचा धोका असल्याने अशी पर्यटन स्थळे पाच दिवस बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाची क** अंमलबजावणी केली जाणार असून त्यासाठी पोलिसांची पथके अशा

विशाळगड प्रकरणाची उच्चस्तरीय समितीकडून सखोल चौकशी व्हावी ; कुंदन पाटील

कोल्हापूर : विशाळगड येथे झालेल्या दंगली प्रकरणी हिंदूत्ववाद्यांना दहशतवादी म्हंटलं गेलं. त्यांचा बोलवता धनी कोण आहे, त्याचीही चौकशी व्हावी. तसंच दहशतवादी हा शब्द मागे घेऊन विशाळगड प्रकरणाची उच्चस्तरीय समितीकडून सखोल चौकशी करावी अन्यथा विशाळगडाच्या दिशेनं पुन्हा आंदोलनं, मोर्चे, विशाळगड घेराव घातला जाईल असा इशारा विहीपचे जिल्हाध्यक्ष कुंदन पाटील यांनी केली.

राज्यातील गडकिल्ल्यांवर अतिक्रमण करून विशिष्ट समाजानं लॅण्ड जिहाद चालवले आहे. वर्षानुवर्ष पध्दतशिरपणे हिंदूंच्या मोक्याच्या जमीनी बळकावण्याचं कारणस्थान केलं जातं आहे. विशाळगडावर गेली अनेक वर्ष अतिक्रमण झाले असून या विरोधात गेल्या दहा वर्षापासून हिंदूत्ववाद्यांनी विविध पध्दतीनं आंदोलन करत आहेत. मात्र त्याची प्रशासन पातळीवर दखल घेतली गेली नाही.

१४ जुलैला अतिक्रमणमुक्तीसाठी गडाच्या पायथ्याला आंदोलन झालं. मात्र गडावर गेलेल्या शिष्टमंडळावर हल्ला झाल्यानं, गडाखाली हिंदूत्ववादी संतप्त झाले. आक्रमक होवून त्यांनी दंगल घडवली. विश्व हिंदू परिषदेनं सनदशिर मार्गानं प्रशासनासोबत समन्वय साधत, अतिक्रमण हटवण्यासाठी प्रयत्न चालवले होते. १४ जुलैला विशाळगड अतिक्रमण आंदोलन करणार्या लोकांवर पोलिसांनी गुन्हे नोंद केले आहेत. हा समस्त शिवप्रेमी आणि गडप्रेमींच्यावर अन्याय आहे. खरे पापाचे धनी गडावरील अतिक्रमणधारक आहेत. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल होणं गरजेचं आहे. ते न झाल्यास विश्व हिंदू परिषदेच्यावतीनं सकल हिंदू समाजाला सोबत घेवून, प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. विशाळगडाच्या दिशेनं पुन्हा आंदोलनं, मोर्चे, विशाळगड घेराव अशा विविध पध्दतीनं आंदोलन करण्याचा इशारा विहीपचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष कुंदन पाटील यांनी दिला.

कोकणात मूर्तीकरांची लगबग वाढली!

शाडू मातीच्या मूर्तींना प्राधान्य

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे सर्वांनाच गणेशोत्सवाचे वेध लागले आहे. कोकणातील गणेशशाळा गजबजू लागल्या आहेत. कोकणातील गावागावांत गणेश कार्यशाळांमध्ये गणेश मूर्ती बनवण्यासाठी मूर्तीकरांची लगबग सुरु आहे. कोकणात गणेश मूर्तीची कला युवापिढी देखील जोपासत आहे.

पावासाळा सुरु झाला की ओढ लागते गणपतीच्या आगमनाची. कोकणात गणेशोत्सवावेळी मोठा जल्लोष असतो. गणेशोत्सवासाठी आता अवघे काहीच दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे कोकणात मूर्तीकरांची लगबग वाढू लागली आहे. सध्या गणेश शाळांमध्ये मूर्ती घडविण्याचे काम जोरात सुरू आहे. कोकणात कागदाच्या लगद्यापासूनही गणेशमूर्ती बनविल्या जातात. पर्यावरणप्रेमी तर वर्षानुवर्ष अशा प्रकारच्या गणेशमूर्ती आणतात. काही दिवसांतच मूर्ती घडवण्याचे काम पूर्ण होऊन ऑगस्टपासून मूर्त्यांचे रंगकाम हाती घेण्यात येणार आहे. कोकणातील गावागावांत पारंपरिक पद्धतीनं शाडू मातीपासून गणेशाची मूर्ती घडवल्या जात आहेत.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे सर्वांनाच गणेशोत्सवाचे वेध लागले आहे. कोकणातील गणेशशाळा गजबजू लागल्या आहेत. गणेशमूर्ती घडविणारे मूर्तीकार मूर्तीच्या निर्मितीमध्ये व्यस्त आहेत. कोकणातील गावागावांत गणेश कार्यशाळांमध्ये गणेश मूर्ती बनवण्यासाठी मूर्तीकरांची लगबग सुरु आहे. कोकणात गणेश मूर्तीची कला युवापिढी देखील जोपासत आहे. आजच्या युवा पिढीचा कल सुध्दा गणेश मूर्ती बनविण्याकडे वळत आहे. कुडाळ तालुक्यातील माड्याची वाडी राईवाडी येथील महादेव गावडे या युवकाने आपल्या गणेश शाळेत मूर्ती बनविण्याचं काम सुरु केलं आहे. येथे प्रामुख्याने मूर्ती हाती पध्दतीने बनवण्याचं काम सुरु आहे. शाडूच्या मूर्तींना अधिक प्राधान्य दिलं जात आहे. आजची युवा पिढी देखील शाडूच्या मूर्ती बनवण्याच्या कलेला प्राधान्य देत आहे.

युवा चित्रकार महादेव गावडे यांनी सांगितलं की, बऱ्याचदा आपण बघतो आपल्याला मूर्ती घडवण्याच्या कलेविषयी जास्त माहिती नसेल, तर आपल्या कामात ती कमी कुठेतरी जाणवते. पण आपण संपूर्ण अभ्यास करून, माहिती घेऊन, मूर्ती बनविण्याचं शिक्षण घेऊन गणरायाची मूर्ती तयार केली तर आपल्याला कोणत्याही गोष्टीत कमी जाणवणार नाही. त्यामुळे मूर्ती तयार करण्यासाठी शिक्षण घेणं अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. आमच्या गणेश शाळेत हाती आणि साच्यातील अशा दोन्ही पध्दतीच्या मूर्ती तयार केल्या जातात. त्या मूर्तींना रंग देऊन आकर्षक पध्दतीने सजवलं जातं. त्यामुळे गणरायाचं रूप अगदी सुंदर दिसतं.

अंगणवाडी मुलांच्या पोषण आहार खर्चात आठ वर्षात वाढ नाही!

मानधनातही गेल्या सहा वर्षात वाढ

मुंबई : देशभरातील कोट्यवधी बालकांना अंगणवाड्यांमधून मिळणार्या पोषण आहाराच्या खर्चात गेल्या आठ वर्षात वाढ करण्यात आलेली नाही तसेच अंगणवाडी सेविकांच्या मानधनातही गेल्या सहा वर्षात वाढ झालेली नसल्याने जिल्ह्या जिल्ह्यात केंद्रीय अर्थसंकल्पाची होळी करण्याचा निर्णय अखिल भारतीय अंगणवाडी सेविकांच्या संघटनेने घेतला आहे.

संपूर्ण देशात ० ते ६ वयोगटातील बालकांच्या पोषण आहार व विकासाच्या दृष्टीने ऐकूण १३ लाख ९६ हजार अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यांमधून कोट्यवधी बालकांना पोषण आहार देण्यात येत असतो. यात पुरेशी पोषक तत्वे असलेला आहार देणे अपेक्षित असून यात खिचडी तसेच वेगवेगळ्या पदार्थांचा समावेश आहे. हा आहार देता यावा यासाठी २०१३ मध्ये केंद्र सरकारने प्रति लाभार्थी ६ रुपयांवरून ७ रुपये ९२ पैसे अशी वाढ केली होती. त्यानंतर २०१७ साली यात ८ पैसे वाढ करून प्रति लाभार्थी ८ रुपये खर्च दिला जाऊ लागला. मागील ७ वर्षात यात कोणतीही वाढ करण्यात आली नसून केंद्रीय मंत्री तसेच या आहाराचे दर ठरविणार्या अधिकार्यांनी एवढ्या पैशात पुरेसे पोषण असलेला आहार तयार करून दाखवावा, असे आव्हान 'अखिल भारतीय अंगणवाडी सेविका व मदतनीस फेडरेशन'च्या उपाध्यक्ष व 'महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटने'च्या अध्यक्षा शुभा शमीम यांनी दिले आहे.

देशभरातील अंगणवाड्यांमधील कुपोषित व तीव्र कुपोषित बालकांची नियमित तपासणी होत असते. याबाबतची सर्व आकडेवारी केंद्र तसेच संबंधित राज्य सरकारांकडे असते. या बालकांना पुरेसा पोषण आहार मिळाला नाही तर त्यांची शारिरीक व मानसिक वाढ खुंटून भविष्यात त्यांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. याची जाणीव असूनही केंद्रीय अर्थसंकल्पात या बालकांच्या पोषण आहारावरील खर्चात तसेच त्यांची व्यवस्थित काळजी घेणार्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या मानधनात मागील अनेक वर्षात योग्य वाढ

करण्यात आलेली नाही असे अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष एम. ए. पाटील यांनी सांगितले.

महाराष्ट्रात एक लाख तीन हजार अंगणवाडी असून सुमारे दोन लाख अंगणवाडी सेविका ० ते ६ वयोगटातील ६० लाखाहून अधिक बालकांना पोषण आहार देण्यापासून आरोग्याची काळजी घेत असतात. २०१४ पूर्वी निवडणूक काळात तत्कालीन भाजप नेते देवेंद्र फडणवीस व सुधीर मुनगंटीवार यांनी अंगणवाडी सेविकांना २० हजार मानधन देण्याची भूमिका घेतली होती. मात्र सत्तेत आल्यानंतर ती कधीही पूर्ण केली नाही, असेही एम. ए. पाटील म्हणाले. देशपातळीवरील लाखो अंगणवाड्यातील बालके व अंगणवाडी सेविका या कायमच उपेक्षित राहिल्याचेही ते म्हणाले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सादर केलेल्या २०२४-२५च्या अर्थसंकल्पात सक्षम अंगणवाडी व पोषण २ या शिर्षकात मागील वर्षीच्या २१,५२३ हजार कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीच्या तुलनेत वाढलेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात तरतूद वढविण्याऐवजी ३२३ कोटींची कपात करून फक्त २१,२०० हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचे शुभा शमीम यांनी सांगितले.

२०१८ पासून गेली ६ वर्षे अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ झालेली नाही. बालकांच्या पोषण आहारावरील खर्चात मागील अनेक वर्षे वाढ न केल्यामुळे आहाराचा दर्जा घसरून कुपोषणात वाढ झाली आहे. या बजेटमध्ये मानधन व आहाराच्या दरात वाढ होईल अशी अपेक्षा होती. परंतु केंद्र सरकारने पुन्हा एकदा अंगणवाडी कर्मचारी व लाभार्थी या दोन्ही घटकांना निराश केल्याचे अंगणवाडी सेविकांच्या संघटनांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर अंगणवाडी सेविका फेडरेशनने देशभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपल्या लाभार्थी पालकांना सोबत घेऊन या निराशाजनक, जनविरोधी बजेटची होळी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यात सध्या पुकारलेल्या असहकार आंदोलनाबरोबर संपूर्ण राज्यातील प्रत्येक प्रकल्पात अर्थसंकल्पाची होळी करण्याचे आंदोलन करण्यात येईल, असेही शमीम यांनी सांगितले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, साताराशिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

संततधार पावसामुळे भोर तालुक्यात जनजीवन विस्कळित

विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांवर झाडांची पडझड झाल्याने काही विद्युत पुरवठा खंडित तर काही ठिकाणी घारांवर झाडे पडल्याने मोठे नुकसान...

भोर - भोर तालुक्यात बुधवार (दि.२४) रोजी पासून दिवसभर पडत असलेल्या संततधार मुसळधार पाऊस व सुसाट्याच्या वाऱ्यामुळे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांवर झाडांची पडझड झाल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला असून काही ठिकाणी घरावरचे पत्रे उडाले तर काही ठिकाणी घारांवर झाडे पडल्याने मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याने शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांचे जनजीवन विस्कळित झाले आहे.

भोर नगरपालिकेच्या नाना नानी पार्क येथील दीडशे वर्षांपूर्वीचे झाड बुधवार (दि.२४) दुपारी कोसळले. सुदैवाने बालोद्यान बंद असल्यामुळे आणि रस्त्यावर कोणीही नसल्यामुळे जीवितहानी झाली नाही.

घरांची पडझड व नुकसान...

संततधार पावसामुळे व वाऱ्यामुळे विसगाव खोऱ्या तील रामोसवाडी (हातनोशी) ता.भोर येथील शेतकरी पांडुरंग सदाशिव बोडरे यांच्या घरावरचे पत्रे बुधवार (दि.२४) रोजी उडून गेले असून शेतकऱ्याचा घरसंसार मुसळधार पावसात भिजून लाखो रुपयांचे नुकसान झाले. तर बाजारवाडी ता.भोर येथील नथु धर्मा यादव यांच्या घरावर झाड पडल्याने घराच्या भिंती वरील मुंढऱ्या तुटल्या व शौचालय पडून अंदाजे चाळीस ते पन्नास हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

ओढे, नाले, भात खासरे भरली....

तालुक्यातील वीसगाव खोरे, आंबावडे खोरे, हिरडस मावळ खोरे, वेळवंड खोऱ्यातील बहुतांशी भात लागवड झाली असून संततधार पावसामुळे भात खासरे, ओढे, नाले भरुन वाहत असल्याने छोट्या मोठ्या पुलांवरून पाणी मोठ्या प्रमाणात येण्याची शक्यता असून हिरडस मावळातील काही गावांमधील संपर्क तुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नुकसानभरपाई मिळवी म्हणुन नागरिकांची मागणी..

प्रशासनाचे तत्काळ घडलेल्या घटनांचा पंचनामा करून संबंधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वीज पुरवठा खंडित...

संततधार पावसामुळे व वाऱ्यामुळे आंबवडे खोऱ्यात झाडे उन्मळून पडत आहेत.आंबेघर येथे मंगळवारी विजेच्या तारांवर झाड पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे कर्नावड,आंबवडे, सांगवी भिडे,नाटंबी,नाझरे, पान्हवळ,करंजे,चिखलगाव, चिखलावडे सह पूर्ण खोऱ्यात गेले दोन दिवस लाईट नसल्याने तर वेळवंड खोऱ्यात गेली आठ दिवसांपासून विजेअभावी नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे.

केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पा विरोधात आंदोलन

वळती : केंद्र सरकारने नुकताच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्याला विकासात्मक काहीच ठोस निधी न मिळाल्याने , राज्यातील जनतेला , शेतकऱ्यांना व कष्टकऱ्यांना काहीच आर्थिक दिलासा न मिळाल्याने केंद्र सरकारचा जाहीर निषेध व्यक्त करण्यासाठी जनतेचा रोष आणि भावना व्यक्त करण्यासाठी आज गुरुवारी (दि.२५) रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक , मंचर याठिकाणी महाविकास आघाडी आंबेगाव - शिरूरच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष देवदत्त निकम, आंबेगाव तालुकाध्यक्ष धोंडिभाऊ भोर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला अध्यक्ष सुरेखा निघोट, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष पूजा वळसे, युवक कार्याध्यक्ष गणेश यादव, लोकनेते किसनराव बाणखेले सोसायटीचे संचालक गणेश खानदेशे, मंचर शहर प्रमुख कुणाल बाणखेले, सुरेश निघोट, दादाभाऊ थोरात, संजय बढेकर, निलेश वळसे, विशाल वाबळे, विनायक लोंढे, शरद बोंबे, प्रतीक भक्ते, दिलीप बाणखेले, सुनील बाणखेले आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

कार्याध्यक्ष देवदत्त निकम आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष विनायक लोंढे यांनी मनोगत व्यक्त केले.

वाहतुकीस अडथळा ठरल्यास कारवाई

दोन दिवसांपूर्वी जाहीर झालेल्या अर्थसंकल्पा मध्ये महाराष्ट्र द्वेष दिसून येतोय.गोरगरीब जनता, शेतकरी वर्ग यांच्या हिताचे निर्णय नाही. खताच्या किंमती कमी झाल्या नाहीत. विकासासाठी भाजप बरोबर सत्तेत जाणाऱ्या नेत्यांनी नक्की कुणाच्या विकासासाठी सत्तेत गेलो हे सांगितले पाहिजे. महाराष्ट्र मध्ये रेल्वे, विमानतळ यांच्यासाठी निधी दिला नाही. केंद्रात देखील एक सक्षम विरोधीपक्षाचे प्राबल्य आहे, जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याची सुबुद्धी परमेश्वराने सरकारला देवो... ह्या अर्थ संकल्पाचा आम्ही महाविकास आघाडीच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करतो.

- देवदत्त निकम

(कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, पुणे जिल्हा)

अतिक्रमणावर कारवाई करण्यासाठी दम असणारा अधिकारी हवा

सातारा : गोडोली तील साईबाबा चौकात चहूबाजूंनी झालेल्या अतिक्रमणावर कारवाई करा, अशी गोडोलीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी बांधकाम विभाग, पोलीस आणि नगरपालिकेकडे निवेदन देऊन मागणी केली होती. दि.१९ जुलै पासून या चौकात कार्यकर्ते हातात फलक घेऊन चौकात गांधीगिरी मार्गाने गेली ६ दिवस आंदोलन करत आहेत. याची प्रशासनाने दखल घेतली नाही मात्र आता आंदोलनाला पाठिंबा मिळू लागल्याने अतिक्रमणांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सातारा शहराचे प्रवेशद्वार असलेला गोडोलीतील साईबाबा चौकात रोजची वाहतूक कोंडीची कटकट सर्वांना असाह्य झाली आहे. रस्त्यावर पार्किंग, हातगाडे, टपऱ्यांमुळे चहूबाजूंनी अतिक्रमण करत विळखा घट्ट केला आहे. हे अतिक्रमण काढण्यासाठी बांधकाम विभाग पोलीस आणि नगरपालिकेकडे काही सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदन दिले तरीही दखल घेतली नाही. दि.१९ जुलै पासून कार्यकर्त्यांनी अतिक्रमण याबाबत प्रबोधनात्मक हातात फलक घेऊन चौकात फिरतात.भर पावसातही हे आंदोलन सुरू असून त्याला वाढता पाठिंबा मिळू लागला आहे. आता अतिक्रमणावर कारवाई करण्यासाठी गांधीगिरी आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होऊ लागले आहेत. लवकरच अचानक या चौकात दिवसभर वाहतूक कोंडी करून प्रशासनाला धारेवर धरण्याचा डाव खेळणार असल्याच्या कार्यकर्तानी घोषित केले आहे.

साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते फादर दिब्रिटो यांचे निधन

मुंबई : मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ख्रिश्चन धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, पर्यावरणवादी कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे आज पहाटे त्यांच्या राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षाचे होते. त्यांच्यावर विरार येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

फादर दिब्रिटो हे ज्येष्ठ धर्मगुरू, कृतिशील विचारवंत आणि साहित्यिक म्हणून ओळखले जात. पर्यावरण रक्षणासाठी त्यांनी हरित वसई ही चळवळ मोठ्या प्रमाणावर राबवली. निसर्गरम्य वसई आणि विरार क्षेत्र सिमेंटचे जंगल होण्यापासून वाचविण्यासाठी त्यांनी दीर्घकाळ लढा दिला.

नवीन महाबळेश्वर भास की आभास : सत्यजीतसिंह पाटणकर

पाटण : तालुक्यात सलग दहा वर्ष सत्तेत असून नवीन महाबळेश्वर प्रकल्पाला चालना दिली गेली नाही आणि आज विधानसभा निवडणूक अडीच तीन महिन्यावर आल्यानंतर नवीन महाबळेश्वर प्रकल्प प्रशासनाकडून राबवणे हा भास आहे का? असा प्रश्न सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांनी उपस्थित केला.

पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत असताना पाटणकर म्हणाले,

पाटण तालुक्यात हातात व चालू असलेले जलपर्यटन काही मंडळींनी तक्रारी करुन बंद केले. सुरु असणारा प्रकल्प बंद पाडला गेला आणि सध्या पाच वर्ष बोटिंग चालू करुयात या पोकळ

घोषणा तालुक्यातील जनतेच्या नशिबी आलेल्या आहेत. कोयना पर्यटनासाठी अनेक मंत्री व वरिष्ठ अधिकारी कोयनेत आणून जागेचे धरण परिसराचा सर्वे व पाहणी केली. आढावा बैठका व पाहणी दौरे करुन पर्यटनाबाबत जागृकता दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला गेला.

मध्यंतरी कालावधीत लोकप्रतिनिधी नीं पर्यटनासाठी विकास आराखडा, जलपर्यटन व इतर प्रकल्प करण्यासाठी कोट्यावधी ची तरतूद केली असं प्रसारमाध्यमातून समजले आहे. वास्तविक दहा वर्षांपूर्वी ही तरतूद केली असती तर आज लोकांना रोजगार उपलब्ध झाले असते. इतकी वर्ष पर्यटना बाबत उदासिनता दाखवली. हे पाटण तालुक्यातील जनतेने व युवकांनी पाहिले आहे.

वास्तविक पाहता या प्रकल्पांसाठी निधीची तरतूद तरी आहे का? हे तपासणे गरजेचे आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात कोट्यावधी रुपयांची तूट आहे, दोन दोन वर्ष झाली महाराष्ट्रात ठेकेदारांची बील निघाली नाहीत. एक नाही अनेक गोष्टी समोर असताना निवडणूकीच्या तोंडावर जाहिर केलेली विकासकामे म्हणजे दिशाभूल करण्याचा एक प्रयत्न आहे अस दिसून येते.

मुख्यमंत्री यांच्या अत्यंत जवळचे असणारे मंत्री यांना पर्यटन विकास आराखडा तालुक्याच्या बाहेर गेला तरी सोयसुतक नाही. पाटण तालुक्याच्या हद्दीबाहेर जलपर्यटन गेले तरी याबाबत ब्र शब्द विद्यमान पालकमंत्री व तालुक्याचे आमदार यांनी काढला नाही. लोकांना फसवण्यासाठी प्रशासन कामाला लावले. लोकांना कोट्याच्या भूलथापा देण हे बंद करा. नवीन महाबळेश्वर च्या नावाखाली सुरु असलेले राजकारण पाटण तालुक्यातील जनतेला चांगलेच माहिती आहे. लोक आता भूलथापांना बळी पडत नाहीत अस सांगितले.

लोणी काळभोर येथे मुळा मुठा नदीला पूर आल्याने एमआयटीचे विद्यार्थी अडकले पाण्यात

तब्बल ४ तासानंतर जेसीबी, ट्रॅक्टर व होडीच्या सहाय्याने विद्यार्थ्यांची सुखरूप सुटका

लोणी काळभोर : गेल्या दोन दिवसांपासून पुणे जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. अतिवृष्टीमुळे नदी- नाल्यांना पूर आला आहे. तर काही गावांचा संपर्क तुटला आहे. जिल्ह्यात पावसाने कहर घातल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. यातच गुरुवारी (ता.२५) पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुळा-मुठा नदीला पूर आला आहे. या नदीचे बॅक वॉटर लोणी काळभोर (ता. हवेली) येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात घुसून थेट रेल्वे पुलाला धडकले आहे. त्यामुळे या शैक्षणिक संकुलात हजारो विद्यार्थी अडकले होते. या पुराच्या पाण्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांची तब्बल ४ तासांच्या प्रयत्नानंतर जेसीबी, ट्रॅक्टर व होडीच्या सहाय्याने सुखरूप सुटका करण्यात आली आहे.

लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नेहमीप्रमाणे विद्यार्थी गुरुवारी सकाळी आठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास शाळेत गेले होते. विद्यार्थ्यांचे वर्गात तास सुरु झाले होते. यातच पावसाने जोर वाढविला होता. तर मुळशी धरणाचे ११ दरवाजे खुले करण्यात आले होते. त्यामुळे मुळा-मुठा नदीने रौद्र रूप धारण केले आहे. मुळा-मुठा नदी दुथडी भरून वाहत होती.

मुळा-मुठा नदीला पूर आल्याने तिचे बॅक वॉटरचे पाणी एमआयटीत घुसण्यास सुरुवात झाली. बघता बघता पाणी सगळीकडे पसरले आणि ते थेट रेल्वे पुलापर्यंत पोहचले. एमआयटीमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने हजारो विद्यार्थी अडकले. तर रामाकृषी रसायन कंपनीकडे जाणारा पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला होता. त्यामुळे राहिंज वस्ती व रामाकृषी कंपनीचा काही काळ संपर्क तुटला होता. लोणी काळभोर येथील मालधक्क्याकडून येणारी सर्व वाहतूक बंद करण्यात आली होती.

दरम्यान, मुसळधार पाऊस कधी थांबेल व आपली यातून कधी सुटका होईल, याची वाट विद्यार्थी अडकलेल्या ठिकाणी पाहत होते. तर विद्यार्थी कधी बाहेर येथील याची वाट पालक एमआयटीच्या गेटसमोर पाहत होते. पुराच्या परिस्थितीमुळे विद्यार्थी जवळजवळ चार तास अडकले होते. तर लोणी काळभोर वाहतूक पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून एमआयटीच्या दिशेने जाणारा रस्ता बंद केला होता.

विद्यार्थ्यांची सुटका

या पुराचा मोठा फटका एमआयटीतील शालेय विद्यार्थ्यांना बसला आहे. विद्यार्थी पुराच्या पाण्यामुळे तब्बल ४ तास अडकले होते. यावेळी निरागस विद्यार्थ्यांना आपली यामधून कधी सुटका होईल, अशी चिंता त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होती. पावसाचा कहर कमी झाल्यानंतर एमआयटी प्रशासनाने पुरात अडकलेल्या विद्यार्थ्यांना जेसीबी, ट्रॅक्टर व होडीच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढले. सुटका झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. तर आपला मुलगा ताब्यात आल्यानंतर पालकांच्या जीवात जीव आला.

२० वर्षांपूर्वीच्या स्मृतींना उजाळा

एमआयटी या शैक्षणिक संकुलनाचे उद्घाटन २० वर्षांपूर्वी करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी भारताची गानकोकिळा लता मंगेशकर, प्रसिध्द मराठी संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, विद्यमान खासदार सुनेत्रा पवार व अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यावेळीसुद्धा मुळा-मुठा नदीला पूर आल्याने सर्वजण नदीच्या बॅक वॉटरमध्ये अडकले होते. त्यांना बोटीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले होते. या पुराचीच प्रचीती लोणी काळभोरकरांना आज आली आहे. त्यामुळे २० वर्षांपूर्वीच्या स्मृती पुन्हा जाग्या झाल्या आहेत.

केजरीवाल यांची कारागृहात हत्या करण्याचा भाजपचा डाव: आम आदमी पक्षाचा आरोप

नवी दिल्ली: दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय समन्वयक अरविंद केजरीवाल यांची कारागृहात हत्या करण्याचा भारतीय जनता पक्षाचा डाव असल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. केजरीवाल यांच्या प्रकृतीची हेळसांड करीत असल्याच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या वतीने निदर्शनेही करण्यात येणार आहेत.

कथित मध्य घोटाळ्यात आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने केजरीवाल यांना २१ मार्च रोजी अटक केली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली. मात्र, याच घोटाळा प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) केजरीवाल यांना अटक केली असून ते तिहार जेलमध्ये आहेत. त्यांना ८ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे न्यायालयाचे आदेश आहेत.

केजरीवाल यांच्या रक्तातील साखरेची पातळी ३ जून ते ७ जुलै या कालावधीत तब्बल २६ वेळा धोकादायक रित्या कमी झाल्याचा दावा आम आदमी पक्षाने केजरीवाल यांच्या वैद्यकीय अहवालाच्या आधारे केला आहे. केजरीवाल यांचा कारागृहात बळी घेण्याचा भाजपचा डाव आहे, असा त्यांचा आरोप आहे.

केजरीवाल यांच्या प्रकृतीची हेळसांड करीत असल्याचा आरोप करून विरोधकांची इंडिया आघाडी ३० जुलै रोजी जंतर-मंतर येथे केंद्र सरकारच्या विरोधात निदर्शनेही करणार आहे.

५० लाख रुपये चोरुन जात असलेल्या चोरास १२ तासात अटक

४५ लाख रुपये हस्तगत

दौंड : केडगाव चौफुला येथुन ऐका हॉटेल मधुन ५० लाख रुपये असलेली पिशवी चोरुन पळुन.जात असलेल्या आरोपीस १२ तासात अटक करुन त्याचे कडुनृ चोरीतील ४५। लाख रुपये हस्त गत केल्यची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळिमकर यानी दिली आहे

याबाबत अधिक माहिती अशी, दि. २३ जुलै २०२४ रोजी यवत पोलिस ठाणेत गु.र.न.७४/२०२४ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(४) ३ (५) प्रमाने गुन्हा दा खल आहे.

दि.२३/७/२०२४ रोजी फिर्यादी शरद मधुकर डांगे वय ७६ , रा.चैतन्य वाडी, ता.जि. बुलढाणा. हे त्यांचीं सुन व व्याही यांचे सह रघुनंदन हॉटेल सोलापुर रोड चौफुला यैथे जेवनासाठी रात्रि ९ वा.सुमारास जेवनासाठी थांबले होते.

त्यावेळी त्याचे सोबत असलेला बंडु उर्फ गजानन काळवाघे याने फिर्यदी शरद मधुकर डांगे वय ७६ यास चाकुचा धाक दाखवून जमिनीच्या व्यवहारातुन विसार म्हनुन मिळालेली ५० लाख रुपये असलेली पिशवी त्याचे चार चाकी असलेले वाहनातुन जबरदस्तीने घेवुन पळुन गेला. अशी फिर्याद फिर्यादीने नोंदवली होती.

सदरचा गुन्हा गंभीर सवरुपाचा असलेने तात्कळ स्थानिक गुन्हे शाखा व यवत पोलिसानी घटना स्थळी भेटृ देवुन फिर्यादी कडे चौकशी कैलीअसता, फिर्यादी शरद डांगे

शिवस्मारकासाठी आझाद मैदानात जागरण गोंधळ

मुंबई : अरबी समुद्रात होणारे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक गेल्या १० वर्षांपासून सरकारने दुर्लक्षित ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारला जागे करण्यासाठी बुधवारी आझाद मैदानात जागरण गोंधळ घालण्यात आला. यापुढेही सरकारने जर गांभीर्याने लक्ष दिले नाही तर स्वाक्षरी मोहीम राबवत जनजागृती करणार व त्यानंतर तीव्र बेमुदत आंदोलन करणार असा इशारा जय शिव संग्राम चे मुंबई अध्यक्ष शशिकांत शिरसेकर यांनी आझाद मैदानात दिला.

२०१३ मध्ये अरबी समुद्रात श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक बांधण्याचा प्रस्ताव आणला होता. त्या नंतर २०१६ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरबी समुद्रात स्मारकाचे जलपूजन केले

होते. आज १० वर्ष होऊन गेली. आतापर्यंत कामाला सुरुवात झाली नाही.

देशांमध्ये इतर करोडो रुपयांचे प्रकल्प तयार झाले.

मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय कोणीही घेत नाही असे सरचिटणीस मुख्य प्रवक्ते दिपक कदम यांनी सांगितले.

९० हजार कोटींचे रस्ते होत आहेत. अटल सेतू झाला. मुंबईच्या जमिनीखालून रेल्वे धावण्याच्या मुहूर्तावर आहे. लाडकी बहिण लाडका भाऊ आदी योजनांच्या घोषणा होत आहेत. मात्र श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रात होणाऱ्या स्मारकाबाबत विरोधक व सत्ताधारी शांत बसले आहेत.

सातारा जिल्ह्यातील ग्रामपंचायतीत शनिवारी दि. २७ रोजी महास्वच्छता अभियान

सातारा : गेले दोन आठवडे कोसळणाऱ्या पावसामुळे सर्वत्र जनजीवन विस्कळीत झालेले आहे. ग्रामीण भागातील अवस्था अत्यंत बिकट झाली असून स्वच्छतेबाबत दुर्लक्षितपणामुळे साथीचे रोग व रोगराई पसरले आहे यावर काही अंश बात करण्यासाठी शनिवारी दि. २७ जुलै रोजी सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतमध्ये महास्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे. अभियानासाठी सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनीच पुढाकार घेतलेला आहे.

सातारा जिल्ह्यातील ग्रामपंचायत व वाड्या वस्तीमध्ये ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यत आले होते. त्यानंतर राजकीय ईस्कूड झाल्यामुळे संत गाडगेबाबा स्वच्छता मोहीम थंडावली होती. त्याचा परिणाम म्हणून पावसाळ्यातील जलजन्य व साथरोग फोफावली आहेत. सरकारी व खाजगी दवाखान्यात सुद्धा रुग्णांची संख्या वाढू लागल्यामुळे अखेर सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनीच महास्वच्छता अभियानासाठी पुढाकार घेतला. शनिवार दि. २७ जुलै रोजी जिल्हयातील सर्व गावांमध्ये महास्वच्छता अभियान राबवणे येणार आहे. सातारा जिल्ह्यात डेगूंची संख्या वाढू लागली आहे. अनेकांना सर्दी, पडसं, जुलाब डोकेदुखी, अंगदुखी असे आजार होऊ लागल्याने दक्षतेचे उपाययोजना सुरू केलेली आहे. पिण्याचे पाणी स्वच्छ असले तरी सध्या वाढत्या पावसामुळे अनेक सार्वजनिक विहिरीमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. माती मिश्रित पाणी जलशुद्धीकरण झाल्यानंतरही पाणी पूर्ण शुद्ध होणे अशक्य झालेले आहे. उघड्यावरील गटार, सांडपाणी याच्यामुळे सुद्धा मच्छर, डास, माश्या, मुंग्या वाढू लागल्याने स्वच्छते शिवाय पर्याय राहिलेला नाही.

यासाठी जिल्हयातील सर्व गावांमध्ये दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत ग्रामपंचायत हद्दीत महास्वच्छता अभियान राबविणेत येणार आहे. या मोहिमेत ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, महिला, बचत गट प्रतिनिधी, शासकीय कर्मचारी, युवक, सार्वजनिक उत्सव मंडळ, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग व विविध उपक्रम राबवण्यात येणार आहे घेण्यात येणार आहे.

गावातील ग्रामपंचायत इमारत, प्राथमिक शाळा, अंगणवाडी, शासकीय कार्यालय स्वच्छ होणार आहे. सार्वजनिक पाणी पुरवठा स्तोत्रांची स्वच्छता व दुरुस्ती करणेत येणार आहे.

टाकाऊ वस्तूंची विल्हेवाट लावून पाणी साचू नये यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. फॉगिंग मशीनद्वारे तसेच तन नाशक फवारणी केली जाणार आहे. तसेच आवश्यकतेनुसार सार्वजनिक ठिकाणी तणनाशकाची फवारणी करणेत येणार आहे. जलजन्य व साथरोग आजार व औषधोपचाराबाबत गृहभेटी व जनजागृती करणेत येणार आहे. महास्वच्छता अभियान उपक्रमासाठी झाडू, कचराकुंड्या, थैल्या, हातमोजे, मास्क, सॅनिटायझर, फावडे, घमेली इ. साहित्य व घंटागाडी उपलब्ध करणेत याव्यात तसेच गोळा होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थितरीत्या विल्हेवाट लावणेत यावी. गोळा झालेला कचरा इतरत्र पडणार, विस्कटला जाणार नाही याची दक्षता घेणेत यावी अशा सुचनाही सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना दिल्या आहेत. त्याचे काटेकोरपणाने पालन करताना सिंगल युज प्लास्टिक विक्री व वापर करणाऱ्या दुकानदारावर दंडात्मक कारवाई व्हावी अशी सूचना दिलेली आहे. गावपातळीवर व्हॉट्स अँप ग्रुप, दवंडी व नोटीस देऊन गावामध्ये सर्व दर्शनी भागात फलक लावून महास्वच्छता अभियानाची प्रसिद्धी व जनजागृती करावी. महास्वच्छता अभियानात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग घेतील याप्रमाणे सर्व तालुक्यांनी नियोजन करावे अशी सूचना सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी दिली आहे.

उजनी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढतोय

धरण उपयुक्त पातळीत जाण्याची अपेक्षा

सोलापूर : सह्याद्री घाटमाथ्यासह भीमा खोऱ्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे इकडे सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे. अवघ्या २४ तासांत धरणात पाच टीएमसी पाणीसाठा वधारला असून शुक्रवारी धरणातील पाणीसाठा प्रथमच उपयुक्त पातळीत येण्याची अपेक्षा आहे.

सायंकाळी उजनी धरणातील एकूण पाणीसाठा ५७.९६ टीएमसीपर्यंत वाढला होता. त्याची टक्केवारी वजा १०.६३ इतकी होती. म्हणजेच धरण वजा पातळीतून उपयुक्त पातळीत येण्यासाठी आणखी केवळ ५.७९ टीएमसी पाणीसाठ्याची गरज होती. गुरूवारी सकाळी सहा वाजता संपलेल्या १२ तासांत धरणात सव्वा टीएमसी म्हणजेच अडीच टक्के पाणीसाठा वाढला होता. सकाळी दौंड येथून धरणात येणा-या पाण्याचा विसर्ग वाढून ४३ हजार १५० क्युसेकवर पोहोचला होता. त्यात पुन्हा वाढ होऊन तब्बल ८० हजार क्युसेकवर गेला होता.

दुसरीकडे पुणे जिल्ह्यातील बंडगार्डन येथून एक लाख क्युसेक विसर्गाने पाण्याचा प्रवाह दौंडच्या दिशेने येत आहे. आणखी काही धरणांतून पाण्याचा विसर्ग वाढल्यामुळे उद्या शुक्रवारी दौंड येथून उजनी धरणात येणा-या पाण्याचा विसर्ग एक लाख ८० हजार क्युसेकपर्यंत वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, खडकवासला धरणातून ३५ हजार क्युसेकने सोडलेला विसर्ग सायंकाळी कमी होऊन तो १५ हजार क्युसेकवर थांबल्याचे जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

क्राईम

सैदापूर येथून एकजण बेपत्ता

सातारा : सैदापूर ता.सातारा येथून विरु शिवाजी गोसावी (वय ४१, रा. सैदापूर) हे दि. २१ जुलै रोजी बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेतल्यानंतरही ते न सापडल्याने सातारा तालुका पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

मोबाईल चोरणारी अल्पवयीन टोळी जेरबंद

सातारा : साताऱ्यात दोन महिलांचे मोबाईल जबरदस्तीने चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलांची टोळी शहर पोलिसांनी ताब्यात घेतली. पोलिसांनी या टोळीकडून चोरी झालेले दोन मोबाईल तसेच गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी व तीन मोबाईल असा २ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याबाबत अधिक माहिती अशी, १२ जुलै रात्री सातारा शहरालगत बॉम्बे रेस्टॉरंट परिसरात दोन महिला थांबल्या होत्या. त्यावेळी दुचाकीवरुन आलेल्या चौघांच्या टोळीने महिलांच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने चोरुन नेले. या घटनेनंतर महिलांनी सातारा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. गुन्हे प्रकटीकरण पथकाने (डीबी) तपास करुन मुलांना पकडले व त्यांनी गुण्याची कबुली दिली. मात्र ते अल्पवयीन असल्याने पुढील कार्यवाही पोलिसांनी केली.

बंदुकीने गोळ्या घालण्याची कुटुंबाला धमकी

सातारा : 'गाडीला कट का मारला?' असे विचारल्याने शिवीगाळ करून बंदुकीने गोळ्या घालून मारून टाकण्याची धमकी एका कुटुंबाला देण्यात आली. या प्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ जुलै रोजी तामजाईनगर येथे घडली. राज मुजावर (रा. तामजाईनगर, सातारा) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, डॅनीएल खुडे (वय ४८, रा. तामजाईनगर, सातारा) हे करंजे नाक्यावरून २२ जुलै रोजी जात असताना त्यांच्या गाडीला संशयित मुजावर याने कट मारला. याचा जाब विचारल्याने खुडे यांना तसेच त्यांचा भाऊ, वहिनी यांना संशयिताने शिवीगाळ केली. तसेच तुम्हाला बंदुकीने गोळ्या घालून मारून टाकीन, अशी धमकी दिली. याबाबत सहायक पोलिस निरीक्षक आंबले हे अधिक तपास करीत आहेत.

कोरेगाव मतदारसंघात जिल्हा परिषद शाळांच्या खोल्या बांधण्याचे स्मार्ट स्कूलसाठी तब्बल ११ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद

ना. महेश शिंदे यांच्या सूचनेनुसार सातारा जिल्हा परिषदेने केली तरतूद

कोरेगाव : कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचा रस्ते मार्गाने विकास करत असताना कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या हितासाठी देखील आता भूमिका घेतली आहे. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील कोरेगाव, सातारा आणि खटाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोल्यांसह स्मार्ट स्कूलसाठी तब्बल ११ कोटी ७४ लाख २५ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची शिक्षणापासून परवड होऊ नये, यासाठी स्थानिक ग्रामस्थ, पालक आणि पदाधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीवरून आणि त्याचबरोबर प्रत्यक्ष पाहणी करून सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक याशनी नागराजन यांना जिल्हा वार्षिक आराखड्यातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची विशेष दुरुस्ती करणे, या लेखाशिर्षाखाली निधीची तरतूद करण्याबाबत सूचना ना. महेश शिंदे यांनी केले होते. त्यानुसार सातारा जिल्हा परिषदेने आपल्या अर्थसंकल्पामध्ये कोरेगाव विधानसभा मतदारसंघासाठी ११ कोटी ७४ लाख २५ हजार रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या खोल्यांची बांधणी व स्मार्ट स्कूलसाठी हा निधी वापरला जाणार आहे.

कोरेगाव तालुक्यामध्ये चिमणगाव येथे सर्वाधिक १० शाळा खोल्या बांधल्या जाणार असून त्यासाठी एक कोटी ५२ लाख ५० हजार रुपये त्या खालोखाल चंचळी येथे आठ खोल्यांसाठी एक कोटी २२ लाख रुपये, पिंपोडे खुर्द येथे सात खोल्यांसाठी एक कोटी सहा लाख ७५ हजार रुपये, एकसळ येथे आठ शाळा खोल्यांसाठी एक कोटी २२ लाख रुपये, हिवरे येथे सात शाळा खोल्यांसाठी एक कोटी सहा लाख ७५ हजार रुपये, पळशी येथे एक शाळा खोलीसाठी १५ लाख २५ हजार रुपये असे एकूण कोरेगाव तालुक्यात ४१ शाळा खोल्या बांधल्या जाणार आहेत.

सातारा तालुक्यात तासगाव येथे चार शाळा खोल्या बांधण्यासाठी ६१ लाख आणि वासोळे येथे चार खोल्या बांधण्यासाठी ६१ लाख रुपये अशा एकूण आठ शाळा खोल्या सातारा तालुक्यात बांधल्या जाणार आहेत.

खटाव तालुक्यामध्ये पुसेगावच्या भवानीनगर मध्ये प्रशस्त अशा सात शाळा खोल्या बांधल्या जाणार असून त्यासाठी एक कोटी सहा लाख ७५ हजार रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्या खालोखाल बुधावलेवाडी येथे आठ शाळा खोल्या बांधण्यात येणार असून त्यासाठी एक कोटी २२ लाख रुपये, बुध येथे तीन शाळा खोल्यांसाठी ४५ लाख ७५ हजार रुपये, मोळ येथे सहा शाळा खोल्यांसाठी ९१ लाख ५० हजार रुपये आणि कातळगेवाडी येथे चार शाळा खोल्या बांधण्यासाठी ६१ लाख रुपये मंजूर करण्यात आल्या आहेत. खटाव तालुक्यात २८ शाळा खोल्या बांधण्यात येणार आहेत.

संपूर्ण राज्यात आता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बनणार स्मार्ट स्कूल; मुख्यमंत्र्यांचा निर्णय

सातारचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे सातारा येथे येण्यापूर्वी सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यापूर्वी कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा या स्मार्ट स्कूल म्हणून नावारूपास आणल्या. त्यासाठी त्यांनी सर्व प्रशासकीय यंत्रणांना बरोबर घेत ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवली. सातारा येथे जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी ही योजना राबविण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर या योजनेची माहिती मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांना दिली. मुख्यमंत्र्यांना ही योजना मनापासून आवडली, त्यांनी ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. एकूणच सर्व जिल्हा परिषद आमच्या शाळा या स्मार्ट स्कूल होणार असून त्यामध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे मोलाचे योगदान आहे, असेही ना. महेश शिंदे यांनी सांगितल.

प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास साधल्याचे समाधान : आ. शिवेंद्रसिंहराजे

आनेवाडी येथे विकास सेवा सोसायटीच्या इमारतीचे उदघाटन

सातारा : सातारा- जावली मतदारसंघात प्रत्येक गावात, वाडी-वस्तीवर विकासगंगा पोहचली आहे. जावली तालुक्याचा सर्वांगीण विकास साधताना पर्यटनवाढ आणि त्यातून व्यवसायवृद्धी, रोजगारनिर्मितीला प्राधान्य दिले आहे. त्यादृष्टीने विविध रस्त्यांचे रुंदीकरण, मजबुतीकरण, काँक्रीटीकरण केले जात आहे. मतदारसंघाचा विकास साधताना ग्रामस्थांना अपेक्षित विकासकामे मार्गी लावली आहेत. असंख्य कामे पूर्ण झाली आहेत तर, अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास साधता आला, याचे मनस्वी समाधान आहे, असे प्रतिपादन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

आनेवाडी ता. जावली येथे महात्मा फुले विकास सेवा सोसायटीच्या नूतन इमारतीच्या उदघाटनप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी जेष्ठ नेते दादा पाटील, प्रतापगड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सौरभ शिंदे, अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे, विभागीय विकास अधिकारी अण्णासाहेब फरांदे, डॉ. प्रमोद फरांदे, सरपंच वैशाली फरांदे, उपसरपंच अमित फरांदे, डॉ. निरंजन फरांदे, सोसायटीचे चेअरमन विवेक पवार, व्हा. चेअरमन विजय फरांदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून जावली तालुक्यात आजअखेर कोट्यवधींची विकासकामे मार्गी लावली आहेत. माझे आणि जावलीकरांचे आपुलकीचे, जिव्हाळ्याचे असे अतूट नाते आहे. प्रत्येक गावाचीच नव्हे तर, प्रत्येक नागरिकाची समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नेहमी करत असतो.

आनेवाडी गावातही अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. ग्रामस्थांच्या मागणीनुसार येथील प्रत्येक समस्या सोडवण्यात येईल, असे आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले. कार्यक्रमाला जेष्ठ सभासद महादेव फरांदे, ऍड. मनोहर फरांदे, शेखर फरांदे, रघुनाथ फरांदे, सोसायटीचे संचालक बाळासाहेब पाटील, साहेबराव फरांदे, रमेश फरांदे, सुरेश फरांदे, कल्याण फरांदे, संकेत फरांदे यांच्यासह सर्व आजी- माजी संचालक, विविध पदाधिकारी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

फलोत्पादन, पुष्पोत्पादन, दुग्धोत्पादन पुरस्कारास मान्यता

झेडपीच्या ठराव समितीत चर्चा

सातारा : झेडपीच्या ठराव समितीच्या सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये शेतकऱ्यांना फलोत्पादन, पुष्पोत्पादन आणि दुग्धोत्पादनमध्ये नवीन तीन पुरस्कार देण्याबाबत मान्यता देण्यात आली. हे पुरस्कार दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने शेती पुरस्कार म्हणून दिले जाणार आहेत. यासाठी २५ हजार, १५ हजार आणि १० हजार रुपये बक्षीस आणि सन्मानपत्र देण्यात येणार आहे. यापूर्वी जिल्हा परिषदेच्या वतीने शेतकऱ्यांसाठी डॉ. जे. के. बसू सेंद्रिय शेती पुरस्कार देण्यात येत होता. आता शेतकऱ्यांसाठी एकूण चार पुरस्कार असणार आहेत.

ही सभा झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश घुले, ग्रामपंचायत विभागाच्या अर्चना वाघमळे, जिल्हा कृषी विकास अधिकारी विजय माईनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विनोद पवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मोदी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे आदी उपस्थित होते.

या ठराव समितीत प्रथम मागील सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. तसेच ठरावावरील कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

त्यानंतर आरोग्य विभाग अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्राच्या औषधे, साधनसामग्री खरेदीला मान्यता देण्यात आली. बांधकाम विभागाकडील ग्रामीण मार्ग विकास आणि मजबुतीकरण योजने अंतर्गत जिल्हा वार्षिक आराखड्यातील कामांनाही प्रशासकीय मंजुरी देण्यात आली.

या सभेत जिल्हा परिषदेमार्फत शेतकऱ्यांना तीन पुरस्कार देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. यामध्ये फलोत्पादन, पुष्पोत्पादन आणि दुग्धोत्पादनमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्यांना दिवंगत यशवंतराव चव्हाण शेती पुरस्कार देण्यात येणार आहे. यासाठी २५ हजार, १५ हजार आणि १० हजार रुपये बक्षीस आणि सन्मानपत्र देण्यात येणार आहे. या नवीन पुरस्कारासाठी सभेत मान्यता देण्यात आली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या शुभहस्ते विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त २९ जुलै रोजी ग्रंथाचे प्रकाशन

मुंबई : महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त भारताच्या माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शुभहस्ते सोमवार, दिनांक २९ जुलै, २०२४ रोजी वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्व या ग्रंथाचे प्रकाशन मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात येणार आहे. दुपारी ३.३० ते ५.०० यावेळेत हा समारंभ आयोजित करण्यात आला असून यावेळी विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहातील निवड केलेल्या सन्माननीय सदस्यांना उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण पुरस्काराने राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष. ड.राहुल नार्वेकर आणि विधानपरिषद उप सभापती मा.डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आज विधान भवन, मुंबई येथे आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत दिली.

या समारंभास राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ उपमुख्यमंत्री . देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि विजय वडेट्टीवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत दादा पाटील, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ आदी उपस्थित राहणार आहेत.

सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधानपरिषदेचा शतक महोत्सवी वाटचालीचा कालखंड असून त्यानिमित्त कार्यवृत्तामधून महत्वाच्या संदर्भांची निवड करत -

१) वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व

२) विधानपरिषदेने संमत केलेली महत्त्वपूर्ण विधेयके, ठराव आणि धोरणे

३) विधानपरिषदेतील विविध विषयांवरील महत्त्वपूर्ण चर्चा

४) शंभर वर्षे, शंभर भाषणे...

अशा प्रकारे चार विविधांगी विषयांवरील संदर्भसमृद्ध ग्रंथसंपदा वाचकांच्या भेटीस देत आहोत.

ग्रंथ निर्मितीसाठी विधिमंडळ वार्तांकनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या ज्येष्ठ पत्रकारांची नियुक्ती करण्यात आली असून या मालिकेतील पहिल्या ग्रंथाचे प्रकाशन दिनांक २९ जुलै रोजीच्या या कार्यक्रमात होत आहे. अन्य तीन ग्रंथांचे काम देखील प्रगतीपथावर आहे. या ग्रंथ संकलन समिती सदस्यपदी ज्येष्ठ पत्रकार सर्वश्री विलास मुकादम, योगेश त्रिवेदी, दिनेश गुणे, संजय जोग, उदय तानपाठक, किशोर आपटे आणि शीतल करदेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुसळधार पावसामुळे साताऱ्यात दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ

अजिंक्यतारा किल्ला मार्गावर कोसळली दरड

सातारा : सातारा शहरासह जिल्ह्यामध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे सातारा जिल्ह्यात आपत्तीच्या घटना घडत असून आपत्ती व्यवस्थापन प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे किल्ले अजिंक्यतारा प्रवेशद्वारासमोर मुसळधार पावसामुळे दरड कोसळली तर कराड तालुक्यात एका बंधाऱ्याला भगदाड पडले पाटण तालुक्यामध्ये रस्ता खचल्याने वाहतूक थंडावली आहे.

सातारा शहरात बुधवारी पहाटेपासून पावसाची संतधर सुरू आहे. यामुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे शहराला लागून असलेल्या अजिंक्यतारा किल्ला मार्गावर प्रवेशद्वारापासून पाचशे मीटर अंतरावर मोठी दरड कोसळली ही दरड कोसळल्यामुळे किल्ल्याकडे जाण्याचा मार्ग बंद झाला होता. सातारा पालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून जेसीबीच्या साह्याने ही दरड तातडीने हटवली. जिल्ह्याच्या पश्चिम भागात जोरदार पावसामुळे कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. भुयाचीवाडी तालुका कराड येथे कृष्णा नदीवरील बंधाऱ्याचा काही भाग वाहून गेला तर सातारा तालुक्यामध्ये माजगाव सह इतर तीन चार गावांचा संपर्क तुटला आहे उरमोडी नदीचे पाणी पुलावरून गेल्यामुळे येथील दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने परिसरातील नागरिकांना खबरदारीची सूचना केल्या असून धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे असे आवाहन करण्यात आलेले आहे. कामरगाव तालुका पाटण येथे पाबळ नाल्याजवळ कोयना नवजा रस्ता खचल्यामुळे सार्वजनिक वाहतुकीचा प्रश्न आरणीवर आला आहे. पाटण तहसीलदारांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी जाऊन उपाययोजना करण्याबाबतची सूचना केली आहे.